दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५० | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

श्री सद्गुरु फायनान्शियल सर्व्हिसेस
(आमच्याकडे खालील कर्ज सुविधा उपलब्ध)
* गृहकर्ज * व्यावसायिक कर्ज * महिलांसाठी लघु उद्योग
* जागा खरेदीसाठी * घर बांधणीसाठी * लघु प्रकल्पासाठी
संपर्क - ७२१९३००७०९

# पनवेलसह रायगडात ढाकुम्माकूम...



**दै.रायगड नगरी । पनवेल/रायगड**

**गोविंदा रे गोपाला, यशोदेच्या तान्हा बाळा, बोल बजरंग बलि की जय, गोविंदा आला रे आला, जरा मटकी संभाल ब्रीजबाला, अशा गीतांच्या तालावर नाचत, ढोलताशांच्या निनादात बेभान होत पनवेलसह रायगडात गोविंदा उत्साहात साजरा करण्यात आला. ठिकठिकाणी बांधलेल्या दहीहंड्या फोडण्यासाठी गोपालांबरोबरच गोपिकाही आघाडीवर होत्या.**

रायगडात सकाळपासूनच बच्चेकंपनीची धूम सुरु होती. अनेक सार्वजनिक मंडळांनी, राजकीय पक्षांनी छोट्या, मोठ्या बक्षिसांच्या हंड्या बांधून गोविंदा पथकांना खेळण्याची संधी दिली होती. सर्वच शहरे, गावागावात बांधलेल्या या दहीहंड्या फोडण्यासाठी गोविंदाची पथके गावागावात फिरताना दिसत होती.

अंगात विविध रंगांच्या जर्सी, डोक्याला रिबीन असा पारंपारिक वेष परिधान करून ग्रुपने हे गोविंदा फिरत होते. हंडी दिसली रे दिसली की मनोरे रचत ती फोडली जात होती. हंडी फुटली की गोविंदा, गोविंदा असा जयघोष करत पुढची हंडी फोडण्यासाठी मार्गस्थ होत होती. असे वातावरण दिवसभर रायगडात सर्वत्र होते.

यावेळी गोपिका पथकेही हंड्या फोडण्यासाठी दिसत होती. त्यामुळे उत्साहात आणखी भर पडत राहिली. पावसानेही जोरदार हजेरी लावल्याने हंड्या फोडणाऱ्या गोविंदा, गोपिका पथकांचा उत्साह आणखी वाढला होता.





# पनवेल महानगरपालिकेच्या ‘अभय योजने’तर्गत शास्ती माफीला मुदतवाढ


## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत आता वाढविण्यात आली आहे. आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९०टक्के सुट राहणार आहे.

तसेच १६ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत कर भरल्यास ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे .तसेच २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपूर्ण कर भरल्यास ५ टक्के सवलतही दिली जाणार आहे.

महापालिकेच्यावतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील २टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.



### कर-मित्र चॅटबॉटचे लोकार्पण

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने ‘कर-मित्र’ चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.

पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

नागरिकांचा अभय योजनेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. म्हणूनच नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९०टक्के सुट राहणार आहे.

### कर-मित्र चॅटबॉट द्वारे नागरिकांना खालील सेवा उपलब्ध

- मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे.
- आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे.
- बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन.
- योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती.
- अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील ‘कर-मित्र’ चॅटबॉट चा वापर करावा.

अभय योजनेमध्ये १८ऑगस्ट ते १५ऑगस्ट आतापर्यंत एकूण २१२कोटी ५७ लाखाची विक्रमी वसुली झाली आहे.

# २६ लाखांची फसवणूक करणाऱ्या दोघांवर गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कांदा या शेतीमालाची ऑर्डर देऊन चांगले पैसे कमवून देतो, असे आमिष दाखवून २६ लाख २४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी पियूष गोहेल आणि नेहा पियूष गोहेल (रा. गांधीधाम, गुजरात) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सविता राहुल खैरनार या आसूडगाव येथे राहतात. त्यांचा शेतीमाल ट्रेडिंगचा एक्सयोर्ट-इम्पोर्टचा व्यवसाय आहे. त्यांना फोनवरून, ई-मेलवरून भारतातून व परदेशातून शेतीमाल कांदा खरेदी करण्यासाठी व्यापाऱ्यांच्या ऑर्डर येत असतात. त्यामुळे त्या कांदा सप्लाय करतात. २०२० मध्ये त्यांना पियूष गोहेल यांचा फोन आला आणि त्यांची पत्नी नेहा गोहेल हिच्या नावे कंपनी असल्याचे सांगितले व कांदा योग्य किमतीत द्या, असे सांगून त्यांना फोटो, व्हिडीओ पाठवण्यात आले.

या वेळी त्यांनी त्यांच्याकडून रोख पैसे २०२३ मध्ये पियूष आणि नेहा यांनी कांद्याची ऑर्डर दिली. त्यांना कंटेनरमध्ये कांदा भरून पावत देऊन कांदा खरेदी केला. त्यानंतर त्यावर ऑर्डरचे पैसे त्यांनी बँकेत रोख स्वरुपात दिले. मात्र, पुन्हा उधारीवर माल द्यावा लागेल, तुमचे पैसे एक महिन्यात परत करतो, असे सांगितले. त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांनी मे २०२३ मध्ये तब्बल २६ लाख २४ हजार २७७ रुपांचा कांदा दिला. एक महिन्यानंतर सविता यांनी त्यांच्याकडे कांद्याच्या पैशांची मागणी केली असता, त्यांनी पैसे देणार नाही, तुम्हाला काय करायचे ते करा, अशी खैरनार यांजी धमकी दिली. या प्रकरणी सविता खैरनार यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# मिनिट्रेन सेवेत वाढ करण्यास रेल्वे प्रशासन ढिम्म

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशविदेशातील पर्यटक नेहमीच माथेरानच्या मिनिट्रेनची सफर मिळावी यासाठी हमखास इथे हजेरी लावत असतात. खासकरून नेरळ मार्गे माथेरान हा प्रवास घडावा ही त्यांची अपेक्षा असते. या मार्गावरून येताना निसर्गाचे मनमोहक नजारे आणि विविध पॉईंट्सचे दुरून दर्शन घडते. डोळे दिपवून टाकणाऱ्या उंच उंच खोल दऱ्या आणि वेडीवाकडी वळणे घेत जमिनीपासून जसजसे वर गाडीचा प्रवास सुरू असतो त्यावेळी आपण आकाश भ्रमंती तर करत नाही ना असाच काहीसा भास झाल्याशिवाय राहत नाही. त्यासाठी देशविदेशातील पर्यटक आवर्जून या ठिकाणी भेट देत असतात.



दरडी कोसळण्याची दाट शक्यता असल्याने रेल्वे प्रशासन दरवर्षी पावसाळ्यात चार महिने ही सेवा बंद करते.१५ऑक्टोबर ते १५ जून या कालावधीत ह्या ट्रेनची सुविधा उपलब्ध असते.परंतु केवळ दोनच ट्रेन या नेरळ माथेरान मार्गावर धावत असल्याने असंख्य पर्यटकांना मर्यादित तिकिटांमुळे या सेवेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे त्यांचा भ्रमनिरास होताना दिसून येत आहे.इंजिन उपलब्ध नसल्याची कारणे पुढे करून अथवा स्टाफ नाही, बोग्यांची कमतरता अथवा तांत्रिक दुरुस्ती अशाप्रकारे सांगून अधिकारी वर्ग वेळ मारून नेत असल्याचे बोलले जात आहे. मुळात या अधिकारी वर्गाची पर्यटकांना उत्तम प्रकारे सेवा उपलब्ध करून द्यावी याबाबत या ट्रेन बाबतीत मानसिकता नाही.

यापूर्वीच्या काळात मिनिट्रेनच्या पाच ते सहा फेऱ्या होत असत

यामध्ये मालवाहू गाडीतून जीवनावश्यक साहित्य असो किंवा बांधकाम साहित्य हे नियमितपणे यायचे. इथल्या शटल सेवेला डबल इंजिन लावून शटलची सुविधा पुरविली जाते. घाटातून केवळ एका इंजिनच्या सहाय्याने पाच ते सहा बोग्या भरून प्रवाशी येतात मग अमन लॉज ते माथेरान दरम्यान घाट सेक्शन नसताना शटल साठी दोन इंजिनची आवश्यकता नाही. यातील काही इंजिन्स नेरळ माथेरान मार्गावर पर्यटकांच्या वाहतुकीसाठी ठेवल्यास असंख्य पर्यटकांना या सेवेचा लाभ घेता येईल त्यासाठी अधिकारी वर्गाने पर्यटकांसाठी उन्हाळ्यातील आठ महिने ही सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी अनेक वर्षांपासून जोर धरू लागली आहे.

> पर्यटकांचे विशेष आकर्षण व जागतिक हरिटेज दर्जा प्राप्त झालेल्या मिनीट्रेनच्या नेरळ माथेरानच्या फेऱ्यामध्ये वाढ व्हावी ही काळाची गरज असून पूर्वी दिवसभरात पाच येण्यासाठी तर पाच जाण्यासाठी फेऱ्या होत असल्याने येणाऱ्या पर्यटकांना आनंद मिळायचा तर येथील सर्वसामान्य लोकांना महिन्याभराचे जीवनावश्यक साहित्य आणणे व सुरक्षित प्रवास करणे अतिशय सुलभ होत होते याचा पुनःश्चविचार रेल्वे प्रशासनाने करून ह्या फेऱ्यामध्ये वाढ करून पर्यटक व नागरिकांना दिलासा द्यावा.
>
> **चंद्रकांत जाधव, माजी उपनगराध्यक्ष, माथेरान**

## पाऊस महाराष्ट्रात मुक्काम ठोकणार

# मुंबई पुण्यासह अनेक जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सुट्टीनिमित्त बाहेर फिरायला जायचे नियोजन असेल, तर विचार करूनच बाहेर पडा. कारण शुक्रवारपासून वाढलेला पावसाचा जोर पुढील काही दिवस कायम राहणार आहे. राज्यातील काही भागांमध्ये अतिमुसळधार ते अतिवृष्टीसदृश्य पावसाचा अंदाज असून, हवामान विभागाने राज्यातील काही जिल्ह्यांना रेड अलर्ट, काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

मोठ्या विश्रांतीनंतर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने जोरदार आगमन केले. गणपती आगमनाची लगबग सुरू असतानाच पावसाने जोर धरला आहे. शुक्रवारपासून सुरू झालेल्या पावसाचा शनिवारी जोर वाढला. मुंबई, ठाणे, पालघर, पुण्यासह मराठवाडा, विदर्भातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाला.

भारतीय हवामान विभागाने कोकणासह काही जिल्ह्यात पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. विशेषतः मुंबई, कोकण आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने पुणे जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. तर मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर गडचिरोली या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी होईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

सोमवारीही (१८ ऑगस्ट) राज्यातील काही भागात अतिमुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना रेड अलर्ट दिला गेला असून, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, बीड, लातूर या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला गेला आहे. शनिवारी (१६ ऑगस्ट) राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे अनेक ठिकाणी नद्यांची पाणीपातळी वाढली, तर पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील धरणांमध्ये पाण्याचा ओघ वाढला आहे. ठाणे जिल्ह्यातील बारवी धरण शंभर टक्के भरले आहे. मराठवाड्यातील काही धरणांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.



# ते माझे घर...

पावसाळा आल्यावर सुखद गारवा येण्याऐवजी चाळीतील रहिवाशांच्या मनांत भीतीचे ढग दाटून येतात. डोक्यावरचे छप्पर आपल्याच डोक्यावर कधी पडेल सांगता येत नाही, अशी स्थिती. पाण्यासाठी वणवण तर ठरलेली. चिंचोळ्या जिन्यांवरून वयोवृद्धांना डॉक्टरकडे जाणेही जिकिरीचे. अशा अतोनात हालअपेष्टांमध्ये आयुष्य काढलेल्या कुटुंबांना वरळीतील मनोऱ्यातील हवेशीर सदनिकेची चावी मिळाली, तो क्षण अपूर्व आनंदाचा ठरला. 'ते माझे घर, ते माझे घर, जगावेगळे असेल सुंदर' या गदिमांनी लिहिलेल्या पंक्तींचीच अनुभूती त्यांना आली असेल. वरळीच्या बीडीडी चाळींमध्ये चार ते पाच पिढ्यांनी दीडशे चौरसफुटांमध्ये आपले कष्टमय जीवन फुलविले. पहिल्या टप्प्यात त्यापैकी साडेपाचशे कुटुंबांना पाचशे चौरसफुटांच्या सदनिका प्राप्त झाल्या आहेत. मुंबापुरीत सर्वसामान्य कष्टकरी असो की बँक, महापालिका, सरकारी कार्यालयात काम करणारा पगारदार, सर्वांचे जीवनचक्र हे आपले हक्काचे घर उभे करण्याभोवती फिरत असते. गिरणी कामगार , रेल्वे व महापालिका कर्मचारी, सफाई कामगार, बांधकाम मजूर, पोलिस या सर्वांनी मुंबई खऱ्या अर्थाने उभी केली. ब्रिटिशांच्या काळात १९२०-२५ या काळात अशा कष्टकऱ्यांसाठी बॉम्बे डेव्हलपमेन्ट डीपार्टमेन्टने वरळी, नायगाव, परळ भागात चाळी उभ्या केल्या. खेदाची बाब म्हणजे कालांतराने अशा कष्टकरी लोकांसाठी किफायतशीर दरांत घरे उभारण्याचा नियोजनकर्त्यांना विसर पडू लागला. या पार्श्वभूमीवर जवळपास पाव दशकाने बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाची स्वप्नपूर्ती होत आहे, याचे महत्त्व मोठे आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी या स्वप्नाची रुजवण केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०१७ मध्ये बीडीडीच्या पुनर्विकासाचे भूमिपूजन झाले होते. आता या सदनिकांच्या चाव्या रहिवाशांच्या हाती सुपूर्द करताना मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला सल्ला अत्यंत मोलाचा ठरतो. ज्यांना घरे मिळाली, त्यांनी ती विकून उपनगरांत जाऊ नये, हा सल्ला त्यांनी दिला. राज्य सरकारने म्हाडामार्फत राबविलेला १७ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाकांक्षी असून त्याद्वारे साडेपंधरा हजार रहिवाशांचे सुसज्ज व प्रशस्त घरांचे स्वप्न साकार होणार आहे. मुंबईतील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांचे सुमारे साडेपाच हजार प्रकल्प बिल्डर कफल्लक झाल्याने किंवा अदृश्य झाल्याने रखडले आहेत आणि रहिवाशांना स्वतःच्या खिशातून भाडे भरून रहावे लागत आहे. मुंबईत एकीकडे गिरण्यांच्या जमिनींवर निवासी संकुलांचे मनोरे आकाशाशी स्पर्धा करत आहेत, तर दुसरीकडे झोपड्या आणि चाळींमध्ये अठराविश्वे दारिद्र्य जमीन व्यापून उरले आहे. महापालिका, राज्य सरकार यांच्या विविध विभागांमध्ये खिसाभरू मध्यस्थांच्या चौकड्या ठाण मांडून आहेत. त्यामुळेच किफायतशीर दरात घरे उपलब्ध होणे, कठीण होऊन बसले आहे. अन्यथा आतापर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण होऊन ४० लाख झोपडीवासियांचेही सदनिकेत स्थलांतर झाले असते. दोनच दिवसांपूर्वी अपात्र व घुसखोरांना बाहेर काढण्यात अपयशी ठरल्याबद्दल न्यायालयाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची खरडपट्टी काढली होती. महारेरा प्राधिकरण अस्तित्वात येऊनही कल्याण-डोंबिवलीसारख्या भागात अनधिकृत इमारती उभ्या राहतात, यातच सारे आले. तेव्हा केवळ कागदावर प्राधिकरणे तयार करून उपयोग नाही, तर त्यांचे कार्य योग्य उद्दिष्टांनुरूप झाले पाहिजे. पुनर्विकास योजनांमध्ये रहिवाशांचा कौल मिळविण्याची ज्याच्याकडे ताकद तो खरा विकासक, असे गणित तयार झाले. पसंतीचा बिल्डर आणण्यासाठी सत्ता, पैसा व बाहुबलाचा गैरवापर सुरू झाला. अनेक राजकारणी विकासक या रूपात दिसू लागले, ते त्यामुळेच. श्रेय लाटण्याची आणि मलिदा खाण्याची स्पर्धा सुरू झाली, ती वेगळीच. या सर्व गोष्टींवर कायद्याचा अंकुश आणून पात्र कुटुंबांना पुनर्विकासाचे लाभ मिळवून देण्यासाठी सरकारी यंत्रणा कार्यतत्पर हव्यात. स्वयंपुनर्विकासाचा शासननिर्णय २०१९ साली येऊनही त्याची पूर्णरूपात अमलबजावणी आजतागायत झाली नसल्याचे 'महाराष्ट्र टाइम्स'ने अलीकडेच उघड केले होते. अनेक वर्षे न्यायालयात लढून एखादे घर मिळाले, तरी त्यात त्या कुटुंबाची उभी हयात खर्ची होते. बिल्डर, विकासक अशा प्रकरणात नामानिराळे राहतात, तर रहिवाशांची आयुष्यभराची पुंजी वाया जाते. शहर घडविणाऱ्या कष्टकऱ्यांसाठी किफायतशीर दरांत घर उपलब्ध करून देण्यास सरकारने प्राधान्य देण्याची गरज आहे. नव्या झोपड्या तयार होणार नाहीत, यासाठी प्रयत्न हवेत; झोपड्या नियमित करण्यासाठी नव्हेत.

### साखर सुतारवाडी पुनर्वसनसंदर्भातील आपली माती आपली माणसं संघटनेचे आत्मदहन आंदोलन यशस्वी

# ना.भरतशेठ गोगावले यांनी नारळ फोडला; दरडग्रस्तांचा प्रश्न सुटला

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या चार वर्षांपासून दरडग्रस्तांच्या पुनर्वसन घरकुलांचे काम रखडलेले असून येत्या वर्षभरात राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे साहेबांच्यामार्फत निधी मिळून पूर्ण होऊ दे...



असं साकडं मनसल्यानंतर राज्याचे रोहयो फलोत्पादन व खार जमीन मंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी नारळ फोडला. यामुळे गेल्या चार वर्षांपासून पुनर्वसनासाठी प्रतिक्षा करणाऱ्या साखर सुतार वाडीतील दरडग्रस्तांना आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीनंतर पुनर्वसन होण्याची खात्री वाटू लागली आहे.

पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनप्रश्नी आपली माती आपली माणसं संघटनेतर्फे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर १४ ऑगस्टरोजी संघटनेतर्फे साखर सुतारवाडी येथे सरण पेटवून त्यावरून उडया घेत प्रतिकात्मक आत्मदहन आंदोलन करण्याचा प्रयत्न झाला.

आपली माती आपली माणसं संघटनेकडून रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी साखर सुतारवाडीतील पुनर्वसनासंदर्भात दरडग्रस्तांची भेट घेऊन सोमवारी तहसिल कार्यालय आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देत स्वातंत्र्यदिनी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी प्रशासनाकडून साखर सुतारवाडीतील दरडग्रस्तांना आत्मदहनापासून परावृत्त करण्यासंदर्भात बैठकांचे सत्र सुरू झाले. मात्र,

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला साखर सुतारवाडी येथे प्रशासनाने भेट देऊन चर्चा करण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी प्रशासनातर्फे प्रांताधिकारी ओमासे, डिवायएसपी शंकर काळे, तहसिलदार कपिल घोरपडे, एपीआय आनंद रावडे, गटविकास अधिकारी दिप्ती गाट, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, उबाठा तालुकाप्रमुख अनिल मालुसरे हे उपस्थित असताना आपली माती आपली माणसं संघटनेचे संस्थापक राज पार्टे, अध्यक्ष निलेश कोळसकर, सचिव संजय उतेकर तसेच विविध कार्यकर्ते पदाधिकारी यांनी चर्चेला प्रतिसाद देण्यापूर्वी १५ ऑगस्टचे आत्मदहन आंदोलन १४ ऑगस्टलाच सुरू करण्याची भूमिका अचानक जाहिर केल्यानुसार उत्स्फूर्तपणे काही उत्साही तरूणांनी रचलेल्या सरणावरील सुके गवत पेटवून त्यावरून उड्या घेण्यास प्रारंभ केला. यावेळी पोलादपूर पोलिसांनी तातडीने हे गवत व सरणाची लाकडं हटवून हा प्रयत्न हाणून पाडला.

महाड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी व राज्याचे रोहयो मंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी पोलादपूर तालुक्यातील केवनाळे आणि साखर सुतारवाडी येथील भूस्खलनाची घटना महाड तालुक्यातील तळीये येथील भूस्खलनाच्यादिवशीच झाली असूनही तळीये येथे पक्की घरं आणि पोलादपूर तालुक्यात तुटपुंज्या रकमेची तरतूद करुन दरडग्रस्तांच्या तोंडाला पाने पुसल्याची संतप्त भावना ऐकून घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या स्वकीय सचिवांसोबत चर्चा करून साखर सुतारवाडीच्या पुनर्वसनासाठी प्रत्येक घरकुलासाठी २.३० लाख रुपयांच्या अनुदानात १० लाख वाढवून देण्याची मागणी केली. यानंतर साखर सुतारवाडीतील ४४ आणि केवनाळे येथील १२८ घरकुलांचे बांधकाम येत्या वर्षभरात पुर्ण होण्यासाठी नारळ फोडून श्रावण महिन्यातील गुरुवारी श्रीदत्तगुरुंना साकडे घातले. यामुळे हे आंदोलन यशस्वी झाल्याची भावना आपली माती आपली माणसं संघटनेतर्फे व्यक्त करण्यात आली.

# पनवेल शहर पोलीस ठाण्यात राबवण्यात आले नशा मुक्ती अभियान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नशा मुक्ती अभियान अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाकरिता पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस निरीक्षक, ६ अधिकारी व १४ पोलीस अमलदार यांनी सहभाग घेतला होता.

सदर वेळी पोलीस अधिकारी यांनी अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत उपसताना मार्गदर्शन करून जनजागृती केली आहे.

यावेळी पनवेल शहर पोलीस ठाणे ते साईनगर परिसरमध्ये पनवेल बोहरी मस्जिद यांचे बँड पथकाकडून रूट मार्च, पनवेल शहर पोलीस ठाणे ते पनवेल शहर परिसरात सायकल रॅली, वडाळे तलाव परिसरात व्ही के हायस्कूल पनवेल एनसीसी विद्यार्थ्यांकडून मानवी साखळी, याकूब बेग हायस्कूल येथे अमली पदार्थ सेवन दुष्परिणाम या विषयावर व्याख्यान तसेच एक धाव नशा मुक्तीसाठी कार्यक्रम, पाडा मोहल्ला मस्जिद येथे अमली पदार्थ दुष्परिणाम या विषयावर मौलवी व पदाधिकारी यांना मार्गदर्शन व सूचना, तहसील कार्यालय येथे अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन, बार्न्स कॉलेज येथे अमली पदार्थ सेवन दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन पर चर्चासत्र तसेच ओरियन मॉल येथे अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती आदी कार्यक्रम राबवण्यात आले.

# कर्जतचे कृषी संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होणार : डॉ. भारत वाघमोडे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्सकडून मोठमोठ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पास मान्यता मिळत असल्याने कर्जतचे कृषी संशोधन केंद्र लवकरच जागतिक दर्जाचे भात संशोधन केंद्र होईल, असा विश्वास सहयोगी संशोधन संचालक डॉ. भारत वाघमोडे यांनी व्यक्त केला. येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचा वर्धापन दिन मुख्य इमारतीच्या प्रांगणात सोत्साह साजरा करण्यात आला.त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



ते म्हणाले की,भात जलद पैदास प्रकल्प, महाअन्नपूर्णा - बदलत्या वातावरणानुरूप भात पिकावरील संशोधन प्रकल्प मंजूर झाल्याने जागतिक दर्जाचे संशोधन करण्यासाठी अद्ययावत सुविधा निर्माण होतील.त्यामुळे कोकणातीलच नव्हे तर राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. आता १४ वर्षांऐवजी ६-७ वर्षातच वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जाती विकसित करणे शक्य होईल.

अद्ययावत भात लागवड तंत्रज्ञान देखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.देशातील मोजक्याच संस्थांत व महाराष्ट्रात फक्त कर्जत येथेच हा प्रकल्प सुरू होत असल्याचा उल्लेख करीत त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी १४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेल्या या संशोधन केंद्राचा देदीप्यमान इतिहास,संशोधित झालेले विविध भात वाण आणि उत्पादनातील योगदान नेटक्या शब्दात विदित केले. सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व मजूर वर्गाने समर्पित भावनेने काम केल्यास केंद्राचा नावलौकिक जगभरात पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऐतिहासिक वारसा असलेल्या संशोधन केंद्राच्या मुख्य इमारतीतील कोनशिलेचे पूजन केल्यावर डॉ. वाघमोडे यांनी डॉ.बाळासाहेब सावंत यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करीत विनम्र अभिवादन केले.

यानिमित्ताने ३९ वे सहयोगी संशोधन संचालक डॉ. वाघमोडे यांचा कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर यांनी सर्वांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी संशोधन केंद्रातील सर्व शास्त्रज्ञ,अधिकारी ,कर्मचारी व उपस्थितांना पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

# पनवेल महापालिका शाळांमध्ये संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५ वर्ष हे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष आहे. शासन निर्देशाप्रमाणे दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज सर्व शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा व ज्ञानेश्वरी ग्रंथ पालखीत ठेवून टाळ मृदुंगाच्या गजर करत पालखीतून मिरवणूक काढण्यात आली.

शेवटी पसायदान म्हणून, पसायदानाचा अर्थ शिक्षकांमार्फत सांगण्यात आला. सर्व मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात आनंदाने सहभाग घेतला.



# जेएसडब्ल्यू फाउंडेशनने ग्रामीण भागातील १५ हजार पेक्षा अधिक कुटुंबांची शेती व उपजीविका सुधारली

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ग्रामीण भागातील शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांसाठी जेएसडब्ल्यू फाउंडेशनची उपक्रम राबवली जाणारी शेती व संबंधित व्यवसायांत सुधारणा ही आजची गरज आहे. जेएसडब्ल्यू फाउंडेशनने या गरजेला प्रतिसाद देत १५,००० हून अधिक कुटुंबांना आधुनिक, शाश्वत व आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या शेतीपद्धती व उपजीविका वाढीच्या विविध योजनांतून लाभ मिळवून दिला आहे.



जेएसडब्ल्यू फाउंडेशनने १ जिल्हा, ४ ब्लॉक, ४६ ग्रामपंचायत व १५२ पेक्षा अधिक गावांमध्ये प्रामुख्याने शेती, मत्स्यपालन, पशुपालन, वृक्षारोपण, लघुउद्योग व सरकारी योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी काम केले आहे. या व्यापक कव्हरेजमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनात दीर्घकालीन बदल घडले आहेत,

मत्स्यपालनाने या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जेएसडब्ल्यू फाउंडेशनने १६० मत्स्यतळे उभारली आहेत, ज्यांतून दरवर्षी सुमारे ५० टन मासे उत्पादन होतो. यामुळे शेतकऱ्यांना मासेमारीतून अतिरिक्त उत्पन्न मिळते, जे त्यांच्या आर्थिक स्थितीत महत्त्वपूर्ण भर टाकते. तसेच स्थानिक पोषणातही सुधारणा होते. याशिवाय, २२ गावकऱ्यांना मत्स्यपालनासाठी आवश्यक किट्स दिल्या गेल्या, ज्यामुळे त्यांनी आपले मत्स्यपालन व्यवसाय उभारला आहे. डच-ठढ प्रकल्पांतर्गत एक फिश फीड मिल युनिट उभारून दर्जेदार माशांचा चारा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे, ज्यामुळे माशपालन अधिक प्रभावी आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत आहे.

जेएसडब्ल्यू फाउंडेशनने स्थानिक पातळीवर फेनॉल, हँड वॉश, लिक्विड साबण आणि तेल तयार करणाऱ्या लघुउद्योगांचे यशस्वी संचालन केले आहे. दरवर्षी युनिट्सद्वारे सुमारे ३०,००० लिटर उत्पादन होते. या उद्योगांनी विशेषतः महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या असून, त्यांच्यात आर्थिक स्वावलंबनाची भावना वाढवली आहे. तसेच स्थानिक उत्पादनांना चालना मिळत आहे, ज्यामुळे आर्थिक चक्र गावांमध्ये फिरते.

जेएसडब्ल्यू फाउंडेशनच्या सहकार्याने ६०० पेक्षा जास्त कोंबडी व शेळी पालन युनिट्स सुरू करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे कुटुंबांना नियमित उत्पन्न मिळत आहे. पशुपालनातून मिळणारे खत शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरते, ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. पशुपालनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होत असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या विविध स्त्रोतांची निर्मिती झाली आहे.

जेएसडब्ल्यू फाउंडेशनने वृक्षारोपण मोहिमेत १४,१०० बांबू, मोगरा आणि नारळाची लागवड केली आहे. यामुळे पर्यावरणाची सुधारणा होते, जमिनीची उत्पादकता वाढते आणि शेतकऱ्यांना दीर्घकालीन आर्थिक फायदा होतो. शिवाय, २ एकर सूर्यफुलाच्या लागवडीचा प्रकल्प यशस्वी पद्धतीने राबवला जात असून, त्यामुळे जमिनीचा दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे आणि पीक विविधीकरणातून उत्पन्न वाढीस चालना मिळाली आहे.

# विसरून राहिलेली पैशाची पिशवी रेल्वे प्रवाशाला परत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्टेशन येथे दिवस पाळी ड्युटीवर असताना कर्जतला येणाऱ्या दुपारच्या ११. ५५ च्या लोकल गाडीच्या मुंबई बाजूकडून चौथ्या जनरल डब्यामध्ये एक काळया रंगाची प्लास्टिक पिशवी राहिली असल्याचे कळविण्यात आले. त्यानुसार पोलीस शिपाई गोरख मासाळ व महिला होमगार्ड मोहिनी जाधव, कल्याणी काळेकर, प्रणाली गोळे यांनी त्या लोकल गाडीची तपासणी केली असता ती पिशवी मिळाली. त्यामध्ये कागदपत्रे व २१ हजार रूपये रोख रक्कम होती.

ही पिशवी रेल्वे पोलीस ठाण्यात जमा केली. तेथील ठाणे अंमलदार महिला पोलीस हवालदार सुमित्रा दोंदे यांनी ज्यांची पिशवी विसरून राहिली होती त्या सय्यद जावेद जफर आबीदी ( वय ६९ ) रा. बदलापूर यांची सविस्तर चौकशी करून त्या वर्णनाची पिशवी व २१ हजार रुपयांसह परत केली.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

### वाडगाव येथे स्वातंत्रदिनाचे औचित्याने नुतन अंगणवाडीचे शुभारंभ

# जिल्हात स्मार्ट अंगणवाडी संकल्पना राबविणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे स्वातंत्रदिनाचे औचित्याने नुतन अंगणवाडी शुभारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

आदिवासी वाडगाव येथे एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अलिबाग यांचे नियोजनातून नुतन अंगणवाडी बांधकाम करण्यात आले. या नुतन अंगणवाडीचा शुभारंभ शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्रदिनाचे औचित्याने महिला व बालविकास मंत्री अदितीताई वरदा सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी त्याचे समवेत राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, राजिप जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, तसेच सोहिता ओव्हाळ, अलिबाग पं.स.गटविकास अधकिारी दाईगडे, सहा.गटविकास अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी शर्मिला पाटील, राजिप उप अभियंता राहूल शेवाळे, विस्तार अधिकारी विजय मयेकर, अमित नाईक, पर्यवेक्षीका भाग्यश्री पाटील, सामिया पेरेकर, कल्पिता साळावकर, गिताजंली, पाटील, विनोदिनी मोकल, व आरती मोकल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन वाडगाव ग्रामपंचायत व उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी केले होते.



कार्यक्रमाचे सुरूवातीला भव्य स्वागत वाडगाव ग्रामपंचायतीचे वतीने व राजिप शाळा शिक्षक यांचे वतीने महिला व बालविकास मंत्री अदितीताई वरदा सुनिल तटकरे यांचे करण्यात आले. प्रारंभी अंगणवाडी विदयार्थ्यासह मंत्री अदिती तटकरे यांचेसह दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला, त्यानंतर महिला व बालविकास मंत्री अदितीताई यांचे हस्ते फित कापून नुतन अंगणवाडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी वाडगाव ग्रा.प. माजी सरपंच सरिता भगत यांनी महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे यांचे तसेच सरपंच सारिका पवार यांचे हस्ते राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांचे स्वागत पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे निमित्ताने मंत्री आदितीई तटकरे यांचे हस्ते ६ महिने पुर्ण मुलांच्या अन्नप्राशन, वाडगाव आदिवासी वाडीवरील गरोदर स्तनदा माताना बेबी केअर किट, तसेच लेक लाडकी च्या लाभार्थीना रूपये ५०००/- रोख धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी वाडगाव ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासीवाडी रोड लाईट व विद्युतीकरण, तसेच हर घर जल नळ कनेक्श्न यांचा शुभारंभ मंत्री अदिती तटकरे यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी उपस्थितांना संबोधीताना जिल्हात स्मार्ट अंगणवाडया संकल्पना राबविणार असल्याचे सुतोवाच केले तर रायगड जिल्हा परिषदे मार्फत् अंगणवाडीतील विविध उणीवाची लागलीच पुर्तता करण्यात येते असे म्हटले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी वाडगाव ग्रा.प. उपसरपंच जयेंद्र भगत, सरपंच सारिका पवार, माजी सरपंच सरिता भगत तसेच ग्रामपंचायत सदस्य, सदस्या शुभांगी भगत, रूपाली प्रसाद पाटील, सजना नाईक,सरिता भगत,संतोष बोले, निलम नरेश थळे,

व ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास आयएसओ लीड किरण भगत, राजिप शाळा वाडगाव शिक्षकवर्ग, अंगणवाडी सेविका व आदिवासी वाडी महिला वर्ग यांची उपस्थिती होते.

# जेएनपीए बंदरात अत्याधुनिक शिक्षण व विकास केंद्र

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि बिव्हीजी इंडिया लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जेएनपीए मध्ये अत्याधुनिक शिक्षण व विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.या केंद्रामुळे लॉजिस्टिक कौशल्यविकास क्षेत्रात एक मह त्वाचा टप्पा ठरणार आहे.या केंद्रात पाच वर्षाच्या कालावधीत २५ हजारांहून अधिक एचएमव्ही/एल एमव्ही चालक व सहाय्यक कर्मचाऱ्यांना निवासी व गैर-निवासी स्वरूपात मोफत,जागतिक दर्जाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

देशातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.हा कार्यक्रम जेएन प्राधिकरण प्रशासन भवन येथे आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून जेएनपीए बंदराचे अध्यक्ष व व्हिपीपीएलचे अध्यक्ष आणि कार्यकारी महासंचालक उन्मेष वाघ उपस्थित होते.यावेळी जेएनपीए भारताच्या सागरी क्षमतांना अधिक बळकटी देऊन आपला जागतिक पातळीवरील व्यापार वाढविण्यासाठी सज्ज आहे.

कौशल्यविकास आणि बंदर भेटीद्वारे सागरी क्षेत्राविषयी जागरूकता निर्माण करण्यावरही आम्ही विशेष भर देणार आहोत.जेणेकरून भारताच्या सागरी क्षमतांचा विकास होईल व पुढील पिढीला प्रेरणा मिळेल असे मत यावेळी उन्मेष वाघ यांनी व्यक्त केले.या केंद्रात पाच वर्षाच्या कालावधीत २५ हजाराहून अधिक चालक व सहाय्यक कर्मचाऱ्यांना निवासी व गैर-निवासी स्वरूपात मोफत,जागतिक दर्जाचे शिक्षण दिले जाईल.



## पनवेलमध्ये 'मयूखा' महोत्सव - भारतीय शास्त्रीय नृत्याचा उत्सव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेलची सांस्कृतिक भूमी भारतीय शास्त्रीय नृत्याच्या रंगांनी उजळून निघणार आहे आणि त्याचे कारण आहे, नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटरच्या वतीने आपल्या समृद्ध नृत्य वारशाच्या जतन व प्रसारासाठी समर्पित एक महोत्सव आणि त्याचे नाव आहे मयूखा. विशेष म्हणजे परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा एवढा मोठा कार्यक्रम रसिकांसाठी विनाशुल्क असणार आहे.

पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय या ठिकाणी होणारा हा कार्यक्रम २३ ऑगस्टला सायंकाळी ०६ वाजता सुरू होणार आहे. यामध्ये नालंदा बानीतील मोहिनीयट्टम ख्यातनाम वादकांचा थेट वाद्यमेळ पनवेल व परिसरातील कला-रसिकांसाठी एक सांस्कृतिक मेजवानी असणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व मयूखा प्रायोजक परेश ठाकूर, नॅशनल टेलिफोन ॲडव्हायजरी कमिटी सदस्य श्री. रमेश, विशेष पाहुणे म्हणून नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उमा रेले, मोहिनीअट्टम नृत्यांगना व संस्थापिका निदेशिका डॉ. डिंपल नायर तर सेलिब्रिटी पाहुणे म्हणून मल्याळम अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना देवी चंदना, मराठी अभिनेत्री व शास्त्रीय नृत्यांगना तन्वी पळव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पद्मभूषण डॉ. कनक रेले यांच्या शिष्या व नालंदा नृत्यकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नयना प्रकाश यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली हा उत्सव आयोजित होत आहे. मयूखाचा उद्देश कलाकार, रसिक आणि सांस्कृतिक प्रेमींना एका व्यासपीठावर आणणे हा आहे. या वर्षीच्या उद्घाटन कार्यक्रमात नालंदा बानीतील मोहिनीयट्टमचे मनमोहक सोलो सादरीकरण होणार असून, ते कलाश्री कलामंदलम सी. गोपाळकृष्णन यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यकलामंदिरम् सेंटर फॉर आर्ट्समार्फत सादर केले जाणार आहे. सादरीकरणासोबत थेट वाद्यमेळाचा संगत असेल, ज्यामुळे प्रेक्षकांना एक अद्वितीय सांस्कृतिक अनुभव मिळेल. मयूखा हे असे व्यासपीठ आहे जे केवळ शास्त्रीय




नृत्यप्रकारांची गहनता आणि सौंदर्य प्रदर्शित करत नाही, तर पुढील पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देते.

नृत्यार्पणा फाईन आर्ट्स सेंटर या उपक्रमाद्वारे तरुण नर्तकांना प्रेरणा देण्याचे आणि प्रेक्षकांना भारताच्या पारंपरिक कलांचा खरा आस्वाद देण्याचे उद्दिष्ट ठेवते. परफॉर्मिंग आर्ट्समधील पदव्युत्तर शिक्षण आणि मोहिनीयट्टमसाठीच्या अनेक वर्षांच्या समर्पणामुळे, नयना प्रकाश यांनी अनेक प्रतिष्ठित मंचांवर सादरीकरणे केली आहेत. त्यांच्या सादरीकरणात लास्य (कोमलता) आणि रौद्रम (तेज) यांचा सुंदर समन्वय दिसून येतो, ज्यामुळे प्रत्येक नृत्यप्रयोग दृश्य व भावनिक दृष्ट्या अद्वितीय ठरतो. परंपरा आणि कलात्मकतेचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक पर्वणी आहे. त्यामुळे याचा लाभ जास्तीत जास्त रसिकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी नयना प्रकाश ७७०००५२४२९ यांना संपर्क साधता येईल.

## भयमुक्त तक्रारीसाठी 'न्याय सारथी'

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भयमुक्त तक्रारीसाठी रायगड पोलिसांकडून आधुनिकतेची मदत घेण्यात आली आहे. आता पीडितांना भयमुक्त तक्रारीसाठी 'न्याय सारथी'चा आधार मिळणार आहे. 'न्याय सारथी' ही प्रणाली पोलीस व नागरिक यांच्यामधील एक दुवा आहे. कृत्रिम बुद्धिमतेचा (एआय) वापर करून ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मित्राप्रमाणे ही प्रणाली काम करणार आहे. न्याय सारथी हॅलो एआय पचा शुभारंभ स्वातंत्र्यदिनी करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली रायगड पोलीस आणि सिमप्लरटुडे.एआय यांच्या संयुक्त विद्यमाने न्याय सारथी प्रणाली सुरु करण्यात आली आहे. काही जणअन्यायाने त्रस्त आणि भीतीपोटी तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. तसेच काहींना तक्रार कशा पद्धतीने द्यायची, याची माहिती नसते. त्याचा परिणाम गुन्हेगार अधिक बळावून भविष्यात गंभीर परिणाम करण्याची शक्यता असते. अन्यायग्रस्तांना न्याय देण्यासाठी रायगड पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) मदत घेतली आहे.

### माथेरान घाटात १५ ऑगस्टला पर्यटकांचा जनसागर

# दस्तुरी नाका ते वॉटर पाईपपर्यंत गाड्यांच्या रांगा, सततची कोंडी पर्यटकांच्या आनंदावर विरजण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

स्वातंत्र्यदिनाच्या सुट्टीचा लाभ घेण्यासाठी हजारो पर्यटक माथेरान घाटात दाखल झाले. सकाळपासूनच घाटाकडे जाणाऱ्या वाहनांची गर्दी वाढत गेली आणि दुपारपर्यंत दस्तुरी नाका येथील वाहनतळ पूर्ण क्षमतेने भरून गेला. वाहनतळात जागा मिळेनाशी झाल्यावर पर्यटकांना रस्त्याच्या कडेला वाहनं उभी करावी लागली. परिणामी दस्तुरी प्रवेशद्वारापासून घाटातील वॉटर पाईप पुढे जुमापट्टी स्थानकापर्यंत वाहनांच्या अखंड रांगा लागल्या यामुळे पर्यटकांना खूपच मनस्ताप सहन करावा लागला.

आज १५ ऑगस्ट स्वतंत्रदिनाची सुट्टी असल्याने माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटकांचा लोंढा वाढला होता. घाटात वाहनांची कासवगती, हॉर्नांचा कर्कश आवाज आणि रस्त्याच्या कडेला पसरलेली गर्दी - यामुळे घाटातील शांत वातावरण गोंगाटमय झाले. पर्यटकांना निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्याऐवजी गाडीतच तासन् तास बसून रहावे लागले. लहान मुलांसह आलेल्या कुटुंबांना विशेष त्रास सहन करावा लागला, तर अनेकांनी उशिरा पोहोचल्याने नियोजित फिरस्तीचे कार्यक्रम रद्द केले. मुंबई ठाणे परिसरातील शाळेच्या ट्रिप देखील झाल्याने अधिकच गर्दी पाहायला मिळाली.

ही परिस्थिती फक्त सध्याचीच नाही. मागील काही आठवड्यांपासून दर शनिवारी-रविवारी अशीच कोंडी होत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या मते, गर्दी वाढल्याने व्यवसायात वाढ होते खरी, पण वाहतूक कोंडीमुळे अनेक पर्यटक नाराज होऊन लवकर परत जातात.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि पोलीस सतत गस्त घालत आहेत. तरीही वाढत्या वाहन संख्येमुळे त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा येत आहेत. काही ठिकाणी वाहने एकेरी रांगेत पुढे सरकत असल्याचे, तर काही ठिकाणी पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र दिसून आले.

याशिवाय, कर्जत तालुक्यातील नेरळ, कर्जत शहर आणि चारफाटा परिसरातही वाहनांची मोठी गर्दी झाली. सुट्टीच्या दिवशी सर्वत्र वाढलेल्या वाहन संख्येमुळे तालुक्यातील मुख्य रस्त्यांवर प्रवास वेळेपेक्षा दुप्पट अधिक वेळ घेऊ लागला.

स्थानिक नागरिक आणि पर्यटकांनी वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी केली असून, विशेषतः सुट्ट्यांच्या दिवशी पर्यायी वाहतूक व्यवस्थेची गरज असल्याचे सांगितले आहे.तर हे नेहमीच वाहतूक कोंडी होत असल्याने माथेरानला येण्यासाठी आतातरी शासनाने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करावी अशी मागणी स्थानिकांमधुन सुद्धा जोर धरू लागली आहे.



## गतिमंद मुलांसाठी उद्योजक राजू पिचीका यांचे दहिहंडीचे आयोजन



**दै.रायगड नगरी । पेण**

आज संपुर्ण देशभरामध्ये दहीहंडीचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा केला जात आहे. पण बौद्धिक अक्षम (दिव्यांग) मुलांना हा आनंद घेता येत नव्हता. मात्र पेणमधील आई डे केअर संस्थेच्या बौद्धिक अक्षम (दिव्यांग) मुलांच्या महाराष्ट्रातील पहिल्या दहीहंडीचे आयोजन रामेश्वर कन्स्ट्रक्शन चे श्री राजू पिचिका यांनी करून एक अनोखा उपक्रम राबविला.

या दहीहंडी उत्सवामध्ये ६९ दिव्यांग मुलांनी सहभाग घेत हंडी फोडण्याचा आनंद लुटला. ही विशेष मुलं पाण्याच्या फवाऱ्यात व आनंदात चिंब भिजली होती, यावेळी निरागस मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. या विशेष मुलांना वेगवेगळ्या कार्यक्रमातून उभारी देण्याचे काम 'आई डे केअर' संस्था करत असून गेल्या १४ वर्षांपासून रामेश्वर कन्ट्रक्शनचे सर्वे सर्वा राजू पिचिका यांनी आमच्या मुलांना दहीहंडी फोडण्याचा मान दिल्याने खूप आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे स्वाती मोहिते यांनी व्यक्त केले.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल (१) ले कर्नल. श्रीराम कमलाकर गाडगीळ(निवृत), रा - फ्लॅट नं - एम ०६, बिल्डिंग नं - एम, टक्कर ए.डबलू.एच.ओ सोसायटी, हडपसर, पुणे, ४११०२८, (२) श्रीमती. कल्पना प्रवीण लोणकर, रा - बिल्डिंग नं - ५, रूम नं - २०२, स्वागत कॉम्प्लेक्स, जरी-मरी मंदीरा जवळ, सुकापुर, न्यू पनवेल, ४१०२०६ आणि (३) श्रीमती. अपर्णा गुरुपरसद पंडित, रा - फ्लॅट नं - जी-२०२, १२८, सीलवन हाइट्स, सानेवाडी, औंध, सीझनस हॉटेल समोर, पुणे - ४११००७, हे स्वर्गीय कमलाकर त्रिमबक गाडगीळ आणि स्वर्गीय चंद्रकला कमलाकर गाडगीळ यांचे कायदेशीर वारस आहेत आणि आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

फ्लॅट नं - १०३, बिल्डिंग नं - बी १, नव भारत को ऑप हाऊसिंग सोसायटी, एकूण एरिया ५०५.७५ sq ft/46.99 sq mtr, सेक्टर-२, सिडको न्यू पनवेल, पनवेल - ४१०२०६

त्यानंतर वरील मिळकतीचे मुळ कागद पत्रे आमच्या अशिलांच्या ताब्यात होते. सदर मिळक्तीचे खालील कागदपत्रे आमचे अशिल यांच्या कडुन गहाळ झाले आहेत. (१) Agreement For Sale no. 823 dated 29 Mar 1992. त्याबाबत आमच्या अशिलांनी खांदेशवर पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचा नं. ०४१६/२०२५ दि. १५/०८/२०२५ असा आहे.

तरी याबाबत कोणाहि व्यक्तीस आक्षेप असल्यास किंवा कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रा सहित १४ दिवसाच्या आत समक्ष भेटावे. १४ दिवसा नंतर आमचे अशील यांस ह्या मिळकतीचा व्यवहार करायची मुभा राहील आणि १४ दिवसांनंतर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

ठिकाण: नवीन पनवेल
दिनांक: १६/०८/२०२५

सही/-
**ॲड.अनिकेत रामदास शेडगे**
**शॉप नं.१, यशो अनुअनंत को.हौ.सो.,**
**प्लॉट नं.६०६ ए, टिळक रोड, पनवेल-४१०२०६**
**मो: ९७६८२०९९२०**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत जोमा हरी गावंड व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे.

असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे आवरे येथील मिळकत भूमापन नं. ११७/७/अ यांसी एकूण क्षेत्र ०.२०.९० हे. आर. प्र. व पोटखराबा ०.००.९० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ३.२५ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : १७ ऑगस्ट २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी,**
**शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**



CNR: MHLC01-001467-2022

क्र. ३९८१/२०२५
कामगार न्यायालय यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१
दिनांक: ७/८/२०२५

**९ वे कामगार न्यायालय, मुंबई**
**श्री. के. के. कुरंदळे, न्यायाधीश यांचे समोर,**
**अर्ज (नुकसान भरपाई अर्ज) क्र. २३९/सी-५९/२०२२**

श्री रोशन कुनिया चौधरी
ग्राम पोस्ट प्रतापपुर, तहसिल बिरसिंग नगर,
जि. सटना, मध्यप्रदेश ४८५२२६ अर्जदार
विरूध्द
१. श्री. रमेश बाबुराव मुंढेकर
मु. उलवे, ता. पनवेल, जि. रायगड
महाराष्ट्र ४१० २०६. विरूध्द पक्ष १
(Motor Truck No. MH-06-AC-5466)
२. रिलायन्स जनरल इन्शुरन्स कं.लि.
४ था मजला, चिंतामणी एव्हेन्यु, विरवानी इंडस्ट्रीयल ईस्टेट,
गोरेगांव पुर्व, मुंबई ४०० ०६३ विरूध्द पक्ष २

ज्याअर्थी रोशन कुनिया चौधरी या अर्जदाराने ते श्री. रमेश बाबुराव मुंढेकर प्रतिवादी क्र.१ यांचेकडे काम करीत असताना दि.०५/०६/२०२१ रोजी झालेल्या अपघातामध्ये गंभीरस्वरूपात जखमी झाल्याने रू.१४,९६,६१०/- एवढी नुकसान भरपाईची रक्कम मिळविणेबाबत श्रमिक भरपाई आयुक्त व मा. न्यायाधीश ९ वे कामगार न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांचेवर पुरेशा पत्त्या अभावी नोटीस बजाविता आली नाही.

त्याअर्थी श्री. रमेश बाबुराव मुंढेकर प्रतिवादी क्र. १ यांना या नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी स्वतः किंवा त्यांच्या वतीने हजर राहणाऱ्या वकील किंवा अधिकृत प्रतिनिधी मार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह ९ वे कामगार न्यायालय, मुंबई यांचेसमोर दि. २१/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

जर ते वर नमूद केलेल्या दिनांकास न्यायालयात उपस्थित राहिले नाही तर मा. न्यायालय त्यांच्या अनुपस्थितीत दावा चालवून योग्य तो आदेश करतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

सदरची नोटीस मे. कोर्टाच्या आदेशाने व कोर्टाच्या शिक्क्याने दिली आहे.

**सही/-**
**सचिव**
**कामगार न्यायालय, मुंबई**


# दहीहंडी द्वारे गोविंदा पथकांचा भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ऑपरेशन सिंदूर द्वारे भारतीय सैन्य दलाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार आणि विचार प्रत्यक्षात उतरवला. पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणे नष्ट करून शत्रूला धडा शिकविला आणि आपल्या शौर्याची जगासमोर प्रचीती दिली आहे. आजच्या या दहीहंडी उत्सवातून गोविंदा पथकांनी सैन्य दलाच्या शौर्याला सलाम करण्याचे सुंदर काम केले आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने शहर व उपनगरातील विविध कार्यक्रमांना भेट देऊन नागरिकांना शुभेच्छा दिल्या. घाटकोपर येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर आयोजित दहीहंडी उत्सव प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित सैन्य दलातील जवानांना भेटून संवाद साधला. कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, आ. राम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,दहीहंडी उत्सवाला उपस्थित असलेल्या सैन्य दलातील जवानांना व त्यांच्या शौर्याला मी मनःपूर्वक सलाम करतो. सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून घाटकोपर येथील उत्सवाने जे कार्य केले आहे ते उल्लेखनीय आहे. गोविंदा पथकांनी उभारलेले थर सैन्य दलाच्या शौर्यासाठी अर्पण केले आहेत, ही एक प्रेरणादायी बाब आहे. त्यांच्या हस्ते माजी सैन्य अधिकारी आनंद तिवारी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सामाजिक कार्याबद्दल चेतन शाह व राजेश भीमसरे यांचा देखील गौरव करण्यात आला. विक्रोळी येथील टागोर नगरमध्ये आरंभ दहीहंडी कार्यक्रमास उपस्थित राहून मुख्यमंत्री म्हणाले, दहीहंडी उत्सवात एकावर एक थर लावला जातो, तेव्हा हा संपूर्ण समाज एकत्रित असल्याचा महत्वपूर्ण संदेश दिला जातो. सर्वांनी एकसंघ राहून पुढे जाण्याचे हे प्रतीक आहे, असे ते म्हणाले. यावेळी श्रुती विनोद घोगळे व सुहास माटे यांची उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती देऊन मुख्यमंत्र्यांचे स्वागत करण्यात आले.

वरळी जांबोरी मैदानावर आयोजित परिवर्तन दहीहंडी उत्सवात छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचे सादरीकरण कलाकारांनी केले. उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा आणि आमदार प्रवीण दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, भोईवाडा येथील स्वातंत्र्यसैनिक सदाकांत ढवन उद्यान येथे साजऱ्या होत असलेल्या दहीहंडी उत्सवाला उपस्थित राहून मुख्यमंत्री फडणवीस यांनी गोविंदा व नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

# कळमजेतील तरूणांनी चाखलं माखन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील कळमजे येथे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. परंपरा, श्रद्धा आणि उत्साह यांचा सुंदर मिलाफ असलेल्या या कार्यक्रमाला गावातील नागरिक, तरुण मंडळी, ग्रामस्थ तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. दहीहंडी म्हणजे एकजूट, परिश्रम, संघभावना आणि परंपरेशी निष्ठा या मूल्यांचे प्रतीक मानले जाते. यंदाच्या उत्सवात शेतकऱ्यांचे नेते पंकज तांबे यांनी हातात गदा घेऊन सहभाग घेउन गोविंदा रे गोपाळा ! ज्याच्या घरात नाही पाणी, घागर उताणी रे गोपाळा ! म्हणत फेर धरला. त्यामुळे या गावातील तरुण, तरुणी तसेच ग्रामस्थ व महिलांच्या भुवया उंचावल्या !

यावेळी माणगाव तालुक्यातील कळमजे येथील देवा प्रतिष्ठान ही दहीहंडी बांधली होती. ती दहीहंडी फोडण्यासाठी शिवगर्जना मित्र मंडळ व देवा प्रतिष्ठान, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, तरुण यांनी सहभाग घेतला होता.ही प्रतिष्ठेची दहीहंडी फोडण्यासाठी भर पावसात गोविंदा रे गोपाळा तुझ्या घरात नाही पाणी, घागर उताणी रे गोपाळा! असे म्हणत फेर धरला होता. यावेळी शिवगर्जना मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते, यावेळी मुकुंद वाढवळ, देवा प्रतिष्ठानचे संस्थापक देवेंद्र राऊत, संभाजी गायकवाड, तसेच गावातील तरुण केतन वाढवळ, अमोल वाढवळ, प्रदेश राऊत, राजेश राऊत, ज्ञानेश्वर राऊत, रंजीत वाढवळ, अंकित वाढवळ, राज राऊत यांच्यासह अनेक तरुण, तरुणी, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंकज तांबे यांनी स्वतः उपस्थित राहून या पारंपरिक जल्लोषात भाग घेतला आणि ग्रामस्थांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी तरुणांना संघटित होऊन सामाजिक कार्यात पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे ग्रामस्थांचा उत्साह आणखी द्विगुणित झाला. दहीहंडी फोडण्यासाठी गावातील तरुणांनी मोठ्या हिरीरीने सहभाग घेतला. हंडीत ठेवलेल्या भेटवस्तूंची उचल करून युवकांनी परंपरेचा सन्मान राखला. एक लाख मोलाची हंडी ही दहीहंडी शिवगर्जना मित्र मंडळाने फोडली.

या प्रसंगी पंकज तांबे यांनी सांगितले की, दहीहंडी हा केवळ धार्मिक किंवा पारंपरिक उत्सव नसून तो तरुणाईच्या जिद्दीचा आणि एकतेचा उत्सव आहे. गावोगावी असे कार्यक्रम आयोजित होत राहिले तर समाजातील बांधिलकी अधिक दृढ होईल आणि तरुणांना सकारात्मक दिशा मिळेल. कार्यक्रमानंतर ग्रामस्थ आणि युवकांनी पंकज तांबे यांचे मनःपूर्वक स्वागत केले व त्यांच्या उपस्थितीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कळमजे गावातील हा दहीहंडी सोहळा परंपरेला अनुसरून जल्लोषात पार पडला. ढोल-ताशांच्या



गजरात, जयघोषांच्या वातावरणात आणि सामाजिक ऐक्याच्या भावनेत रंगलेला हा उत्सव ग्रामस्थांच्या मनात दीर्घकाळ स्मरणात राहील, असा अनुभव सर्वांना आला.

# रायगड मेडिकल असोसिएशनकडून ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जीवनदानाचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । कर्जत**

१५ ऑगस्ट २०२५ - रायगड मेडिकल असोसिएशन आणि कन्झ्युमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन, कर्जत-नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्यदिन भव्य रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराने साजरा करण्यात आला.

हे शिबिर शनैश्वर मंदिर, महावीर पेठ, कर्जत येथे सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, रक्तवीर राजाभाऊ कोठारी - ज्यांनी आतापर्यंत ५२० रक्तदान शिबिरे आयोजित केली आहेत, आणि कन्झ्युमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशनचे अध्यक्ष राकेश परमार यांच्या हस्ते झाले. या वेळी सचिव डॉ. प्रशांत गांगल, खजिनदार डॉ. कुमार ओसवाल, संपादक डॉ. दिलीप सावळे, डॉ. मनीष परमार, डॉ. रितेश जैन, डॉ. राहुल ओसवाल, डॉ. प्रेमचंद जैन, मुकेश कटारिया, नरेंद्र बोराडे, रवींद्र हिंगाड, तसेच पत्रकार विजय मांडे उपस्थित होते.

रक्तदान शिबिराची सुरुवात सतीश पिंपरे यांनी रक्तदान करून केली. हे त्यांचे ७५ वे रक्तदान ठरले. रक्तसंकलनाची जबाबदारी माया ब्लड बँक यांनी सांभाळली. शिबिरात रक्तदानासोबत मोफत दंत तपासणी, मुखाचा कर्करोग तपासणी (सर्वांसाठी)



स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी (महिलांसाठी - थर्मल व्हॅनद्वारे) या तपासण्या टीजीएच ऑन्कोलाईफ कॅन्सर हॉस्पिटल, तळेगाव यांच्या सहकार्याने पार पडल्या.

या प्रसंगी डॉ. कुमार ओसवाल आणि कर्जत मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. अमित ओसवाल यांचा सत्कार वाटिकेचे अध्यक्ष राजेश सोलंकी यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाला उद्योजक सचिन ओसवाल, सुजित जैन, सौ. भावना परमार, सौ. रीना ओस-वाल इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त पेण मंडळातील विविध विभागात ग्रामसभेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

केंद्र सरकारच्या पी.एम.सुर्यघर योजना, पी.एम.कुसुम योजनेची माहिती रायगड जिल्ह्यात असलेल्या वीज ग्राहकांना देण्यासाठी स्वातंत्रदिनानिमित्त दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी महावितरण पेण मंडळ कार्यालय कडून विविध ठिकाणी मेळावे घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात अधीक्षक अभियंता, पेण मंडळ श्री. बिक्कड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. तसेच, पेण मंडळ परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे अलिबाग येथील सावरसई, सपोळा गावात, पनवेल ग्रामीण येथील खीरखिंडी गावात, रोहा येथील रोहा, तांबडी,मोरभा, लोंशी व वाली तसेच गोरेगाव विभागातील दिघी, महाड व इतर एकूण १५ गावांमध्ये झालेल्या ग्रामसभेत पंतप्रधान सूर्य घर मुफ्त बिजली योजना , मॉडेल सोलर विलेज व महावितरणच्या इतर योजनांचे सादरीकरण करण्यात आले व सर्वसाधारणपणे या सर्व ग्रामसभेमध्ये लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. तसेच, योजनेमध्ये सामील होण्यासाठी लोकांनी सकारात्मक चर्चा केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने वृक्षारोपणाच्या दिलेल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी १५ ऑगस्ट पर्यंत ३०० झाडांचे वृक्षारोपण मंडळामध्ये विविध कार्यालयामार्फत करण्यात आले. राहिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी २० ऑगस्ट पर्यंत ठिकठिकाणी वृक्षारोपण करायचे नियोजित केलेले आहे.

मुख्य अभियंता भांडुप परिमंडल श्री. संजय पाटील, अधीक्षक अभियंता, पेण श्री. धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनखाली कार्यकारी अभियंता, सर्वश्री. प्रदीप दाळू, रामकृष्ण पाटील, शैलेश कुमार व विद्यासागर शिंदे यांनी ग्रामसभा घेऊन ग्राहकांना योजनांची माहिती देण्यासाठी धडक मोहीम राबिवली.



# पनवेलमध्ये ११ हजार ६०० जणांचे दोनदा मतदान : बाळाराम पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत ११ हजार ६०० जणांनी दोनदा मतदान केल्याची माहिती माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिली आहे. या आकडेवारीबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी मतचोरीच्या मुद्द्यावरून देशात रान पेटवले आहे. त्यातच शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल येथील माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पनवेल मध्ये ११ हजार ६०० जणांनी दोनदा मतदान केले असल्याची माहिती समोर आणली आहे. माजी आमदार बाळाराम पाटील यांनी



१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातून नुकतीच निवडणूक लढवली. भाजपचे प्रशांत ठाकूर यांनी त्यांचा पराभव केला.

या पार्श्वभूमीवर बाळाराम पाटील यांनी पनवेल मतदारसंघात मत चोरीचा उच्चांक झाल्याचा आरोप करत मतच-ोरीची आकडेवारी सादर केली आहे. या मतदारसंघात तब्बल ८५ हजार २११ दुबार मतदार असून त्यातील ११ हजार ६०० जणांनी दोनदा मतदान केले आहे. दुबार मतदार सापडल्यानंतर त्याची तक्रार १० सप्टेंबर २०२४ रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली. या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली. त्यानंतर मुंबई हायकोर्टात रीट पीटिशन दाखल केली. ही दुबार नावे वगळण्याचा आदेश हायकोर्टाने दिल्यानंतरही अद्यापही नावे वगळण्यात आलेली नसल्याने विविध स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे.

## श्रीकालभैरव अश्वारूढ मुर्तीची १५० वर्षांची परंपरा

# मुरुड बाजारपेठेत महिलांच्या दहीहंडीचा थरार

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील कित्ते भंडारी समाजाच्या वतीने श्रीकालभैरव मंदिरात भव्य अश्वारूढ मुर्तीची प्रतिष्ठापना दर वर्षी करण्यात येते. मुरुड भंडारवाडा येथील श्रीकालभैरव मंदिरात गेली दिडशे वर्षांहून अधिक काळ ही परंपरा भंडारी समाज बांधव जोपासत आहेत. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सात दिवस आधी या मुर्तीची स्थापना करण्यात येते. व दहीहंडीच्या दिवशी सर्व हंड्या फोडल्यानंतर रात्री विसर्जन करण्यात येते.

मुरुडमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)शहर शाखेतर्फे हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ मुरुड बाजारपेठेत गेली पंधरा वर्षे खास महिलांसाठी मानाची दहीहंडी बांधण्यात येते. ही दहीहंडी यंदाही श्रीकाळभैरव गोविंदा पथकाने फोडून ट्रॉफी मिळविल्या बद्दल मानाचा चषक देण्यात आला.

श्री कालभैरव भंडारी महिला गोविंदा पथकांची स्थापना पंधरा वर्षांपूर्वी करण्यात आली.या गोविंदा पथकाचे संस्थापक माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांनी केली.

पूर्वी भंडारवाडा मर्यादित हा गोविंदा पथक होता. आता मात्र मुरुड मधील सर्व जातीच्या महिला यात सहभागी होतात. या महिलांचा उत्साह पाहून गेले पंधरा वर्षापासून शिवसेनेच्या वतीने मुरुड बाजारपेठेतील दहीहंडीचे आयोजन तालुका संघटक कुणाल सतविडकर हे करत आले आहेत.

गेली दहा वर्ष महिला गोविंदा पथक ही दहीहंडी फोडून ट्रॉफी मिळवित आहेत. गोविंदा महिला पथकासाठी प्रशिक्षक समीर सुर्वे हे मेहनत घेत आहेत. या गोविंदा पथकासाठी भंडारी समाजाचे मोठे सहकार्य लाभले.

यावेळी भंडारी समाज बांधव व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्वातंत्र्यदिनी देखील वीजग्राहक 'महावितरण'च्या विद्युत पुरवठा बंदीच्या जोखडात ; ग्राहक हवालदिल

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील विद्युतप्रवाह सुरळीत राहण्यासाठी गेल्या दोन मंगळवारी लोडशेडींग घेणाऱ्या महावितरणने स्वातंत्र्यदिनीदेखील पोलादपूर शहरातील काही भागातील ग्रहकांना विद्युतपुरवठा बंदीच्या जोखडामध्ये अडकविल्याचे दिसून आले. यामुळे विद्युत ग्राहक हवालदिल झाल्याचे दिसून आले. स्मार्ट मीटरची सक्ती करण्यासाठी लोडशेडींगची युक्ती महावितरणच्या अभियंत्यांनी अवलंबिल्याची चर्चा यानिमित्ताने होत आहे.



पोलादपूर तालुक्यातील शहरासह अर्ध्याअधिक ग्रामीण भागात ५ ऑगस्टरोजी तारा ओढणे, जंपर बसविणे तसेच अन्य कामांसाठी महावितरणतर्फे विद्युत पुरवठा बंद ठेऊन दुरूस्तीची कामे करण्यात आली. यानंतर पोलादपूर तालुक्यातील उर्वरित ग्रामीण भागामध्ये १२ ऑगस्ट रोजी याच कामांची पूर्तता करण्यासाठी पुन्हा लोडशेडींग जाहिर करून विद्युतपुरवठा बंद ठेवण्यात आला. या लोडशेडींगमुळे पोलादपूर तालुक्यात सणासुदीच्या काळात विद्युतप्रवाह बंद पडणार नसल्याचे सांगितले गेले.

स्वातंत्र्यदिनासारखा राष्ट्रीय सण असताना सकाळी साडेसहा वाजल्यापासून विद्युतप्रवाह खंडीत झाला. अधिक चौकशी करता पोलादपूर शहरातील भैरवनाथनगर येथील डीपी रोहित्र बंद झाल्याने स्वातंत्र्यदिनीदेखील वीजग्राहक 'महावितरण'च्या विद्युतपुरवठाबंदीच्या जोखडात अडकल्याची माहितीअंती समजून आले.

विद्युतप्रवाह सुरू होण्यासाठी किती काळ लागेल, याबाबत चौकशी करताना विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार डीपी बंद झाल्यास किती दिवसांपर्यंत विद्युतपुरवठा बंद ठेवावा, याबाबत मुभा असल्याची माहिती महावितरणच्या अभियंत्यांकडून सांगण्यात आली. एकीकडे, मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी स्मार्ट मीटर्सची सक्ती विद्युत ग्राहकांवर करता येणार नसल्याचे विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये कथन करूनही पोलादपूर तालुक्यात अभियंत्यांकडून जनमित्रांद्वारे अनेक ग्राहकांना स्मार्ट मीटर्स बसविण्याची सक्ती केल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, अधिकाधिक ग्राहकांनी स्मार्टमीटर बसवून न घेतल्यास विद्युतपुरवठा बंदीची टांगती तलवार ग्राहकांच्या माथी ठेवण्यात आली आहे. एमइआरसी म्हणजेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बाबाआदमच्या जमान्यातील डीपी बसविण्याबाबतच्या निर्देशांनुसार किती दिवसांमध्ये डीपी बसवावा आणि ग्राहकांना विना विद्युतवापराची सवय लावायची, याबाबतचे निकष पुढे करायचे दुसरीकडे विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी अनुदान द्यायचे आणि तिसरीकडे स्मार्ट मीटरच्या सक्तीने ग्राहकांचे आर्थिक शोषण करायचे, हे धोरण ग्राहकांच्या हिताविरोधात असल्याने तालुक्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

पोलादपूर शहरातील आनंदनगर, जुना महाबळेश्वररस्ता, भैरवनाथनगर, चित्रेंची गढी, प्रभातनगर पूर्व वसाहत तसेच प्रभातनगर पश्चिम लोकवस्ती याठिकाणी दिवसभर विद्युतपुरवठा खंडीत राहिल्यानंतर याठिकाणी अन्यप्रकारे विद्युतपुरवठा तातडीने सुरू करता येऊ शकत असूनही विद्युत अभियंत्यांनी स्वातंत्र्यदिनी वीजग्राहकांना तब्बल १२ तासांपेक्षा अधिककाळ विद्युतपुरवठा बंदीला सोसण्यास भाग पाडल्याने ग्राहकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.